# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Phone: 0257-2221288
Email: srojalgaon1@mpcb.gov.in
Visit us At: www.mpcb.gov.in

महाराष्ट्र

Sub-Regional Office-Jalgaon,
Third Floor, Old B. J. Market,
Jalgaon-425001

No. MPCB/SROJ/ 343

Date: 24/07/2019

To,
**The Joint Director (WPC),**
**MPC Board,**
**Mumbai.**

**Subject:** Minutes of Special Task Force for Polluted River Stretches.

**Reference:** (1) Collector order dt.02/07/2019.
(2) Meeting held on 19/07/2019.

Respected Sir,

With reference to above subject matter, 1st meeting of Special Task Force for Polluted River Stretches was held on 19/07/2019 in the chamber of Secretary, District Legal Service Authority, Jalgaon, minutes of meeting is enclosed herewith.

This is submitted for your information, please.

D. A.: As above.

**(S. M. Kurmude)**
Sub-Regional Officer,
MPC Board, Jalgaon

Copy submitted for information to:
The Regional Officer, MPC Board, Nashik.

# महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी: ०२५७-२२२१२८८
ई-मेल: srojalgaon1@mpcb.gov.in
संकेतस्थळ: www.mpcb.gov.in

उप-प्रादेशिक कार्यालय,
बी. जे. मार्केट, हॉल नं. ए,
तिसरा मजला, जळगांव

क्र. मप्रनिमं/उप्राकाज/ 341

दिनांक: 24/०७/२०१९

**प्रति,**
**(१) मा. सचिव,**
**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,**
**जळगांव.**

**(२) मा. उप-जिल्हाधिकारी,**
**रो. ह. यो., जळगांव.**

**(३) मा. पोलीस निरिक्षक,**
**जिल्हा विशेष शाखा,**
**जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय,**
**जळगांव.**

**विषय:** प्रदूषित नदी पट्टे संवर्धनाकरीता गठीत पर्यावरण संनियत्रण दलाच्या बैठकीचे इतिवृत्त...

**संदर्भ:** स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची पहिली बैठक दि.१९/०७/२०१९.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कळविण्यात येते की, प्रदूषित नदी पट्टे संवर्धनाकरीता जळगांव जिल्हयासाठी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल **(Special Environment Surveillance Task Force)** गठित केले आहे. सदरील दलाची पहिली बैठक आपल्या अध्यक्षतेखाली दि.१९/०७/२०१९ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडलेले आहे.

आपल्या माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर

आपला विश्वासू,

**(सो. म. कुरमुडे)**
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, जळगांव.

सोबत :- वरील प्रमाणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक.

## प्रदूषित नदी पट्टे संवर्धनाकरीता गठीत

## पर्यावरण संनियत्रण दलाची बैठक दि.१९/०७/२०१९

### इतिवृत्त

मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांचे मुळ अर्ज क्र. ६७३/२०१८ प्रकरणी दिनांक २०/०९/२०१८ रोजीच्या आदेशान्वये व महाराष्ट्र शासन निर्णय दि.१३/१२/२०१८ अनुसरुन मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या दि.०२/०७/२०१९ रोजीच्या आदेशान्वये स्वतंत्र पर्यावरण सनियत्रंण दल **(Special Environment Surveillance Task Force)** समिती गठीत करण्यात आली. त्यानुसार पर्यावरण संनियत्रंण दलाची प्रथम बैठक दि.१९/०७/२०१९ रोजी सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या कक्षामध्ये घेण्यात आली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ. क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. कौशिक हेमचंद्र ठोंबरे | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगांव |
| २ | श्री. प्रसाद मते | सहाय्यक जिल्हाधिकारी, जळगांव |
| ३ | श्री. एम. ए. राठोड | सहाय्यक पोलीस निरीक्षक, जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव |
| ४ | श्री. प्रभाकर वावडे | क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव |

सर्वप्रथम श्री. प्रभाकर वावडे यांनी सदस्यांना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात समाविष्ट असलेल्या जळगांव जिल्हयातील सात प्रदूषित नदी पट्टयांबद्दल माहिती दिली. या सात प्रदूषित नदी पट्टयांपैकी पाच नद्या जवळपास वर्षभर कोरडया असतात व तापी नदीमध्ये पाण्याचा प्रवाह आढळून येतो. या समाविष्ट नदी पट्टयांपैकी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पाण्याचे नमूने प्रत्येक महिन्याला संकलीत केले जात असून सदरील तपासणीमध्ये घरगुती सांडपाण्यामुळे नद्यांचे पाणी काही प्रमाणात प्रदूषित झाले असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

दलाच्या सदस्यांमध्ये चर्चा करुन सर्व प्रदूषित नदी पट्टयांची पांहणी करण्याचे ठरविण्यात आले. त्या अनुषंगाने प्राथमिक स्वरुपाची माहिती संकलीत करण्याबाबत खालीलप्रमाणे जबाबदारी निश्चित करण्यात आली.

| अ. क्र. | मुद्दा | सविस्तर चर्चा |
|---|---|---|
| १ | नदी पाण्यामधील प्रदूषणास जबाबदार घटक जसे की, नगरपालिका / ग्रामपंचायत, उद्योगांव्दारे सोडण्यात येणारे सांडपाणी नगरपरिषदांव्दारे विनाप्रक्रिया सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याची माहिती व प्रक्रिया यंत्रणा बसविण्याबाबतची सद्यस्थिती | प्रदूषित नदीपट्टयालगत असलेली गावे / शहरे यांची यादी व लोकसंख्या तयार केली आहे. नदी पट्टयालगत कोणताही मोठा उद्योग स्थित नसून ईतरत्र असलेल्या उद्योगांव्दारे निर्माण होणारे सांडपाणी याबाबतची माहिती मप्रनि मंडळाच्या प्रतिनिधींनी पुढील बैठकीत देण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| २ | उल्लेखित नदी पट्टयांमध्ये होत असलेले अवैध वाळू उत्खनन | शासनातर्फे देण्यात आलेल्या वाळू पट्टयांची माहिती – जिल्हाधिकारी कार्यालय प्रतिनिधींनी तसेच अवैध वाळू उत्खनन होत असलेली क्षेत्रे – पोलीस अधिक्षक कार्यालय प्रतिनिधींनी याबाबतची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी. |
| ३ | नदीलगत वृक्षारोपण करण्यासाठी जागा / क्षेत्र पडताळणी करणे | नदीपट्टयांची पाहणी दरम्यान वृक्षारोपण करण्यासाठी जागेबाबत पडताळणी करण्यात येईल. तसेच वृक्ष लागवडी करीता लागणारी आर्थिक मदतीसाठी तरतूद मप्रनि मंडळातर्फे करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात यावा. |
| ४ | पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह नदीमध्ये मिसळला जावा, याबाबतची माहिती | नदीपट्टयांची पाहणी दरम्यान पडताळणी करण्यात येईल. |
| ५ | नदीच्या पाण्याची गुणवत्ता तपासणी | पाहणी दरम्यान पाण्याचे नमुने संकलीत करणे, तसेच पाहणी दरम्यान आदेशानुसार मप्रनि मंडळाच्या प्रतिनिधींनी पाहणी करण्याबाबतची सुची तयार करणे. |

पुढील ७ दिवसांमध्ये आवश्यक माहिती तयार करुन पुढील बैठक आयोजित करण्याचे ठरले. संकलीत माहितीच्या आधारे पाहणी दरम्यान निरीक्षण नोंदविण्यास मदत होईल, अशी चेक लिस्ट (Check List) तयार करणे व त्यानुसार नदी पट्टयांची पाहणी करण्याबाबत बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला.

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठकीची सांगता करण्यात आली.

उप-प्रादेशिक अधिकारी,<br>
मप्रनि मंडळ, जळगांव.